• वर्ष : ०३ • अंक : २२६ • पुणे • गुरुवार, दि. ७ मे २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313





दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





## थोडक्यात पण महत्वाचे



## पुणे मिसिंग लिंक मुळे महत्त्वाचा अडथळा दूर

- स्थावर मालमत्ता आणि गोदाम व्यवस्थेसाठी नवीन वाढीचा मार्ग खुला


पुणे (आरंभ पर्व) : गुलाम झिया, आंतरराष्ट्रीय भागीदार, वरिष्ठ कार्यकारी संचालक – संशोधन, सल्लागार सेवा, पायाभूत सुविधा आणि मूल्यांकन, नाईट फ्रँक इंडिया यांनी सांगितले, "पुणे मिसिंग लिंकचे उद्घाटन हे भारतातील सर्वाधिक वर्दळीच्या वाहतूक मार्गांपैकी एका मार्गाचे महत्त्वपूर्ण उन्नयन दर्शवते. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील हा 13.3 किमी वळणमार्ग दीर्घकाळापासून असलेला अडथळा दूर करतो, प्रवासाचा वेळ जवळपास 30 मिनिटांनी कमी करतो आणि धोकादायक घाट विभागातून वाहतूक वळवून सुरक्षितता व कार्यक्षमता दोन्ही सुधारतो. या प्रकल्पाचे प्रमाण 'टायगर व्हॅली'वरील भारतातील सर्वात लांब आणि उंच दोरआधारित पूलाच्या समावेशामुळे अधिक अधोरेखित होते." ते पुढे म्हणाले, "स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून, अशा प्रकारची पायाभूत सुविधा ही बाजाराच्या उत्क्रांतीसाठी महत्त्वाची प्रेरक शक्ती ठरते. मुंबई आणि पुणे यांच्यातील सुधारलेली जोडणी या दोन शहरांमधील एकात्मता अधिक मजबूत करेल आणि या मार्गावर निवासी व व्यावसायिक विकासासाठी नवीन संधी निर्माण करेल. यामुळे गुंतवणुकीसाठी उपलब्ध क्षेत्राचा विस्तार होईल, खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल आणि नवीन वाढीची केंद्रे उदयास येण्यास मदत होईल. गोदाम व्यवस्था आणि पुरवठा साखळी क्षेत्रालाही याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. जलद आणि अधिक विश्वासार्ह वाहतूक तसेच अवघड भूभागाचा टप्पा दूर झाल्यामुळे परतीचा कालावधी आणि कार्यकारी कार्यक्षमता सुधारेल. यामुळे उच्च दर्जाच्या गोदामांची मागणी वाढेल आणि मोठ्या साठवण केंद्रांच्या विकासाला चालना मिळेल, ज्यामुळे ई-वाणिज्य, उत्पादन आणि तृतीय-पक्ष पुरवठा साखळी सेवा यांसारख्या क्षेत्रांना समर्थन मिळेल."



## काँग्रेस भवन येथे लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन

पुणे (आरंभ पर्व) : आरक्षणाचे जनक, समतावादी लोकराजे राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस काँग्रेस भवन येथे विनम्र अभिवादन करण्यात आले. पुणे जिल्हा काँग्रेस चे अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.चव्हाण पाटील म्हणाले ,गोरगरिबांच्या,बहुजनांच्या मुलांना शिक्षण मिळण्यासाठी,कलेच्या संवर्धनासाठी तसेच सामाजिक अन्यायाविरुद्ध,जातीभेद प्रथेविरुद्ध बहुमुल्य योगदान दिले. याप्रसंगी उपस्थित पुरंदर तालुका ज्येष्ठ नेते सुनील असुलीकर, पुणे शहर काँग्रेस कमिटी पर्यावरण विभाग उपाध्यक्ष धनंजय पाटील, पुणे जिल्हा किसान काँग्रेस अध्यक्ष शंकरराव दांगट, मिडिया सेल अध्यक्ष सुरेश नांगरे,देवराज यादव, नरेश आवटी, पुणे शहर रिक्षा संघटना अध्यक्ष दिलीप लोळगे , अपंग सेल जिल्हा अध्यक्ष ध्यनेश्वर निम्हण, ज्येष्ठ नागरिक उपाध्यक्ष नाना बेडगे,, आदी उपस्थित होते.

## कृषीमंत्री श्री दत्तात्रय भरने यांच्या हस्ते 'बायोॲग्री नेक्स्ट २०२६'चे उद्घाटन



पुणे (आरंभ पर्व) : पहिल्या आवृत्तीच्या उल्लेखनीय यशानंतर, दुसरी 'बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पो २०२६' ही १४–१५ मे २०२६ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथील हॉटेल हयात रीजेन्सी येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. यांच्याकडून करण्यात आले असून, नोवोनेसिस आणि कान बायोसिस यांच्या सहकार्याने तसेच झायडेक्स ग्रुप आणि एपिलॉजिक इंडिया यांच्या मजबूत पाठिंब्याने हा उपक्रम साकारला जात आहे. या कार्यक्रमाला अधिक प्रतिष्ठा लाभणार असून, महाराष्ट्र शासनाचे माननीय कृषिमंत्री श्री दत्तात्रय भरने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून 'बायोॲग्री नेक्स्ट २०२६'चे उद्घाटन करणार आहेत. यामुळे शाश्वत शेती क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार आहे. कृषी जैविक क्षेत्रातील आशियातील सर्वात मोठे आणि प्रभावी व्यासपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिषदेत २५०० हून अधिक वरिष्ठ (C-level) प्रतिनिधी, ५० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वक्ते, १०० पेक्षा अधिक प्रदर्शक आणि १० हून अधिक देशांतील सहभागी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. कृषी मूल्यसाखळीतील ज्ञानविनिमय, जागतिक भागीदारी आणि व्यावसायिक सहकार्यांसाठी हा कार्यक्रम एक गतिमान मंच ठरणार आहे.

## 'ऑल आऊट' मोहिमेत रिक्षातून फिरणारे दोघे कोयत्यांसह जेरबंद

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पोलिसांच्या 'ऑल आऊट कोम्बिंग ऑपरेशन'दरम्यान लोणी काळभोर पोलिसांनी कारवाई करत दोन संशयितांना कोयते व धारदार शस्त्रांसह जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. सदर कारवाई कदमवाकवस्ती (ता.हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील घोरपडेवस्ती येथे रात्री ११ ते पहाटे २ वाजण्याच्या दरम्यान केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी गणेश रघुनाथ बनसोडे (वय २१, रा. घोरपडे वस्ती लेन नंबर ७ कदमवाकवस्ती ता. हवेली, जि. पुणे ) व अभिजीत दिलीप खर्चे (वय १८, रा. फ्लॅट नंबर १०२, सैनिक अपार्टमेंट, आष्टापुरे मळा रोड, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) यांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार अशोक भागवत गिरी यांनी सरकारच्या वतीने फिर्याद दिली आहे. लोणी काळभोर पोलिसांचे विशेष पथक लोणी काळभोर हद्दीत पेट्रोलिंग करत होते.

# डॉ. दुधभाते यांच्या 'नेत्रकोष'चे प्रकाशन

## मुंबईत 'नेत्रकोष' पुस्तकाचे प्रकाशन; डोळ्यांच्या आरोग्यावर सोप्या भाषेत मार्गदर्शन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील प्रख्यात नेत्ररोग तज्ञ डॉ. अनिल दुधभाते लिखित 'नेत्रकोष' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रसन्न वातावरणात पार पडले. साध्या आणि सोप्या भाषेत लिहिलेल्या या पुस्तकाचे अवलोकन करताना मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.



या पुस्तकाला ज्येष्ठ नेत्ररोग तज्ञ डॉ. तात्याराव लहाने तसेच प्रसिद्ध 'दीक्षित डाएट' संकल्पनेचे जनक डॉ. जगन्नाथ दीक्षित यांची प्रस्तावना लाभली आहे. 'नेत्रकोष' या पुस्तकामध्ये डोळ्यांच्या विविध आजारांबाबत अत्यंत सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक आजाराचे कारण, तो टाळण्यासाठी घरच्या घरी करता येणाऱ्या उपाययोजना, तसेच आजार झाल्यास प्राथमिक पातळीवर कोणती काळजी घ्यावी आणि नेत्रतज्ञांचा सल्ला केव्हा घ्यावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. डॉ. दुधभाते यांच्या सुमारे १५ वर्षांच्या अनुभवावर आधारित हे पुस्तक असून, विविध आजारांमधून बरे झालेल्या रुग्णांचे अनुभव आणि अभिप्रायही त्यांच्या स्वतःच्या भाषेत यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

हे पुस्तक वाचक आणि रुग्णांसाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म Amazon वर उपलब्ध असून लवकरच विविध पुस्तक विक्री केंद्रांवरही उपलब्ध होणार आहे.

तसेच सिंहगड रोड येथील डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरमध्येही हे पुस्तक मिळणार आहे. या प्रकाशन सोहळ्यास आमदार अभिमन्यू पवार, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सौ. डिंपल दुधभाते, साहित्यिक गिरीश वसेकर, डॉ. स्नेहल मानपुत्र, तन्मय कारंजकर, कृष्णा सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ३५० लिटर हातभट्टी दारू नष्ट; आई–मुलासह तिघांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यावर पोलिसांनी कारवाई करुन ३५० लिटर रसायनमिश्रित गावठी हातभट्टीची दारू नष्ट केली आहे. याप्रकरणी आई–मुलासह दारू पुरवठा करणारा या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी अक्षय बजरंग मुळेकर (वय २४) आणि त्याची आई मंदा मुळेकर (वय ४७) यांचेसह दादा खलसे ( रा. उरुळी कांचन, ता. हवेली) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार प्रविण दडस यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने दत्त पार्क परिसरात छापा टाकला. यामध्ये अक्षय आणि त्याची आई मंदा मुळेकर यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ३५ लिटर क्षमतेच्या १० प्लास्टिक कॅनमध्ये साठवलेली उग्र वासाची, आरोग्यास अत्यंत घातक अशी गावठी दारू आढळून आली. ही दारू रसायन मिसळून तयार करण्यात येत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी कॅनमधील द्रवाची पाहणी केली असता त्यातून तीव्र आंबट वास येत होता. ही दारू मानवी आरोग्यास घातक ठरू शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. सॅम्पल म्हणून १८० मिली दारू जप्त करून उर्वरित सर्व दारू पंचांसमक्ष जागीच नष्ट करण्यात आली.

## धाडसी चोरी : चक्क पत्रकाराची दुचाकी लंपास



### पोलीस ठाण्याजवळूनच चोरी

रात्री १२:३० च्या सुमारास जेव्हा सागर यांना जाग आली, तेव्हा त्यांना आपली दुचाकी गायब असल्याचे दिसून आले. परिसरात शोध घेऊनही गाडी मिळून आली नाही. विशेष म्हणजे, ही घटना पोलीस ठाण्यापासून अवघ्या काही अंतरावर घडली आहे. चोरीला गेलेल्या दुचाकीची किंमत सुमारे २५,००० रुपये इतकी आहे.

**वडोद बाजार: (दै. आरंभ पर्व)**

औरंगाबाद ग्रामीण पोलीस दलाच्या हद्दीतील वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या परिसरात चोरांचा सुळसुळाट वाढला असून, आता पोलीस ठाण्यापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर चोरीची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. 'दैनिक आरंभपर्व' चे मुक्ताईनगर तालुका प्रतिनिधी सागर राजेंद्र नानोटे यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने भरदिवसा लंपास केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सागर राजेंद्र नानोटे (२९, रा. मुक्ताईनगर) हे ५ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगरहून मुक्ताईनगरकडे जात असताना वडोद बाजार परिसरातील खामगाव फाट्या जवळील मेंढीवाला हॉटेल येथे थांबले होते. दुपारी ४:०० च्या सुमारास त्यांनी आपली लाल रंगाची हिरो स्पेंडर आय-स्मार्ट (क्र. MH-19-CH-8793) एका वडाच्या झाडाखाली उभी केली आणि ते तिथेच विश्रांतीसाठी झोपी गेले.

याप्रकरणी सागर नानोटे यांनी वडोद बाजार पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सुनील अरुण इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. भरवस्तीतून आणि पोलीस ठाण्याच्या जवळून दुचाकी चोरीला गेल्याने सर्वसामान्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## पर्वती पायथा येथे संतापजनक घटनेविरोधात संतप्त आंदोलन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती पायथा परिसरात अवघ्या नऊ वर्षांच्या चिमुरडीवर तिच्याच सख्ख्या आजोबांकडून अत्याचार करण्याचा प्रयत्न झाल्याच्या धक्कादायक घटनेच्या निषेधार्थ परिसरात तीव्र आंदोलन करण्यात आले. या संतापजनक घटनेविरोधात स्थानिक महिला, सामाजिक कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते.

आंदोलनादरम्यान आरोपीच्या प्रतीकात्मक तिरडीची मिरवणूक काढून निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच तिरडीला चपला मारत "अशा नराधमांना समाजात जागा नाही", "लहान मुलींवरील अत्याचार थांबवा", "महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कारवाई करा" अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.



यावेळी माननीय रूपाली पाटील, सामाजिक कार्यकर्त्या संगीता तिवारी, प्रिया सूर्यवंशी यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. उपस्थितांनी पीडित मुलीला न्याय मिळवून देण्याची मागणी करत आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.

या आंदोलनाचे नियोजन व आयोजन भारती लोंढे यांनी केले होते. परिसरातील महिलांनी अल्पवयीन मुलींवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत तीव्र संताप व्यक्त केला. "आज अशा विकृत प्रवृत्तीविरोधात समाज रस्त्यावर उतरला नाही, तर उद्या प्रत्येक घरातील मुलगी असुरक्षित होईल. अशा नराधमांना तात्काळ कठोर शिक्षा झालीच पाहिजे," अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

## एयू स्मॉल फायनान्स बँकेची शून्य चलन-विनिमय फरकासह निधी हस्तांतरण सेवा सुरू

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

AU Small Finance Bank (एयू) या बँकेने आंतरराष्ट्रीय निधी हस्तांतरण क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी शून्य चलन-विनिमय फरक आणि शून्य बँक शुल्क असलेली नवी सेवा सुरू केली आहे. या उपक्रमामुळे देशांतर्गत तसेच परदेशातील व्यवहार करताना लपलेले खर्च पूर्णपणे दूर होणार असून ग्राहकांना प्रत्यक्ष संदर्भ विनिमय दरावर व्यवहार करण्याची सुविधा मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये साधारणपणे दिसणाऱ्या शुल्कांव्यतिरिक्त विनिमय दरामध्ये लपलेला अतिरिक्त फरक आकारला जातो. हा 'अदृश्य खर्च' अनेक वर्षांपासून ग्राहकांवर पडत होता. एयू बँकेच्या नव्या सेवेमुळे हा लपलेला खर्च पूर्णतः काढून टाकण्यात आला असून व्यवहार करताना कोणताही अतिरिक्त दरफरक किंवा शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे परदेशात शिक्षणासाठी निधी पाठवणारे पालक, कुटुंबीयांना आर्थिक मदत करणारे नागरिक तसेच गुंतवणुकीसाठी निधी पाठवणाऱ्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही सेवा Liberalised Remittance Scheme अंतर्गत परदेशात निधी पाठवणाऱ्या भारतीयांसाठी उपयुक्त ठरणार असून परदेशस्थ भारतीय नागरिकांनाही (एनआरआय) या योजनेचा लाभ मिळणार आहे.

## थेऊरमध्ये ६ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचाराचा प्रयत्न

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

सुट्टी असल्याने आईसह आजोळी आलेल्या ६ वर्षांच्या चिमुकलीस बॅड टच करून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एकास तात्काळ अटक करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर प्रकार मंगळवार (५ मे) रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारांस घडला आहे. याप्रकरणी पिडीत अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून श्रीधर लिंबाजी कांबळे (वय ४६, रा. भीमनगर, थेऊर) याला अटक करण्यात आली आहे. पुणे येथे रहात असलेली पीडित चिमुकली उन्हाळ्याच्या सुट्टीत आईसह आपल्या आजीकडे थेऊर येथे आली होती. ती मंगळवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारांस आपल्या तीन मैत्रीणींसमवेत बसली होती. यावेळी श्रीधर कांबळे तेथे आला व चिमुकली शेजारी बसून तिला बॅड टच करून तिचा विनयभंग केला.

## संकल्प इंटरनॅशनल स्कूलकडून बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इयत्ता १०वी व १२वीच्या (SSC व HSC) बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी संकल्प इंटरनॅशनल स्कूलतर्फे (Form No. 17) विशेष प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बोर्ड परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि यशस्वी भविष्यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा उद्देश आहे.

शाळेमार्फत विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे सखोल मार्गदर्शन केले जाणार असून, नियमित चाचणी मालिका, वैयक्तिक लक्ष आणि बोर्ड परीक्षेसाठी खास तयारी यावर विशेष भर दिला जाणार आहे. अनेक विद्यार्थी विविध कारणांमुळे बाहेरून परीक्षा देतात. अशा विद्यार्थ्यांना योग्य दिशा आणि आत्मविश्वास मिळावा यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे. अनुभवी व प्रशिक्षित शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडचणी दूर करून त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला जाणार आहे.

याबाबत संस्थापक निलेश गिरमे म्हणाले, "बहिस्थ विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असते. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वास मिळाला तर हे विद्यार्थी उत्तम यश संपादन करू शकतात. संकल्प इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि यशासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे." प्रवेश प्रक्रिया मर्यादित जागांसाठी सुरू असून, विद्यार्थ्यांनी व पालकांनी त्वरित नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संकल्प इंटरनॅशनल स्कूलचा पत्ता – हर्षल कॉम्प्लेक्स, सर्वे क्र. 48/25/5, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, सिंहगड कॉलेज जवळ, मानाजीनगर, नऱ्हे, पुणे – 411041 असा आहे. अधिक माहितीसाठी 8010185705 किंवा 9699321392 या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड गौरव : 'मिसिंग लिंक' प्रकल्पासाठी नवयुगाचे केले कौतुक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

Navayuga Engineering Company Limited (NECL) ने मुंबई-पुणे एक्सप्रेसवे 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा भाग म्हणून जगातील सर्वात रुंद भूमिगत बोगदा तयार करून कारकिर्दीतला दुसरा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पटकावला आहे. हा अभूतपूर्व पराक्रम भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून अभियांत्रिकी कौशल्य आणि आपल्या क्षमता ओलांडण्याच्या धाडसी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.





अनेक वर्षांपासून सह्याद्री पर्वतरांगांमधून होणारा मुंबई-पुणे प्रवास निसर्गरम्य असला तरी वेळखाऊ आणि अनिश्चित होता. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महाराष्ट्र शासनाने १३.३ किमी 'मिसिंग लिंक' जोडण्याची संकल्पना मांडली. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDCL) यांनी साकारला आणि नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडने प्रत्यक्षात आणला. महाराष्ट्र दिनी उद्घाटन झालेला हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरला आहे. खंडाळा घाटातील वाहतूक टाळून हा मार्ग प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी करतो आणि महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वाहतूक मार्गावरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करतो. या ऐतिहासिक क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा पवार आणि नवयुगा इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर उपस्थित होते. नावयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर म्हणाले, "हा केवळ जागतिक विक्रम नाही, तर भारत काय साध्य करू शकतो याचे द्योतक आहे. सह्याद्रीतील कठीण बेसॉल्ट खडकांमध्ये सर्वात रुंद भूमिगत बोगदा उभारणे ही आमच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या क्षमतेची साक्ष आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डकडून मिळालेली ही पावती आणि मान्यता आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे." NECL चे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि प्रादेशिक प्रमुख श्री रमेश सिंगूरू म्हणाले, "या प्रकल्पासाठी लाखो मनुष्यांची मेहनत, वेळ आणि चिकाटी लागली. या भव्य उपक्रमासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळवताना नवयुगाचे प्रतिनिधित्व करताना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो." ते पुढे म्हणाले, "जमिनीच्या मर्यादा आणि डोंगराळ-खोलीच्या भूप्रदेशातील तीव्र उतारांमुळे प्रकल्पात मोठी आव्हाने होती. यावर सूक्ष्म नियोजन आणि प्रगत अभियांत्रिकी उपायांनी मात करण्यात आली. यात ३०० मीटर अंतरावर क्रॉस पॅसेजेस, NATM पद्धतीने नियंत्रित स्फोट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला." मोठ्या जलसाठ्याखाली बांधकाम करताना अत्याधुनिक SCADA प्रणाली, उच्च-दाब पाण्याच्या फवाऱ्याद्वारे अग्निशमन, ITMS, सार्वजनिक घोषणा प्रणाली, SOS यंत्रणा आणि प्रगत वायुवीजन प्रणाली यांचा वापर करून उच्च सुरक्षामानके राखली गेली.

तसेच सुमारे १८० मीटर खोल दरीत UHPFRC गर्डर्स वापरून व्हायाडक्ट बांधण्यात आले. हा १३.३ किमी लांबीचा प्रकल्प असून त्यातील १०.६७ किमी भाग ५-लेन दुहेरी बोगद्यांचा आहे, ज्याची रुंदी प्रत्येकी २२.३३ मीटर आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### टँकर वेल्डिंग करताना स्फोट, एक कामगार गंभीर जखमी





लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर येथील पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या माळी मळा परिसरात आज मंगळवारी (५ मे) रोजी सकाळी पेट्रोलजन्य टँकरच्या वेल्डिंगचे काम सुरू असताना टाकीत असलेल्या गॅसमुळे अचानक झालेल्या स्फोटात भाजल्यामुळे एक कामगार गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरातील 'भारत वेल्डिंग वर्क्स' या वर्कशॉपमध्ये मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारांस टँकरच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. काम सुरू असतानाच अचानक मोठा स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की वरील पत्र्याचे शेड तुटून पत्रे बाजूला उडून पडले. या घटनेत चांद बाबू हा कामगार गंभीर भाजला. स्फोटानंतर तो शेडखाली अडकला होता. घटनेची माहिती मिळताच माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर यांचेसह अजय मोरे, अनिरुद्ध मराठे आणि रामा काळे यांनी प्रसंगावधान दाखवत जखमीला बाहेर काढले आणि तातडीने रुग्णवाहिका बोलावून पुण्यातील रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. स्फोटात टँकरचे मोठे नुकसान झाले असून काही अंतरावरपर्यंत आवाज ऐकू गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने इतर कोणतीही जीवितहानी झाली नाही. संबंधित टँकरचा वापर पेट्रोल व डिझेल वाहतुकीसाठी केला जात होता. टाकीत उरलेल्या ज्वलनशील वायूंच्या साठ्यामुळे वेल्डिंगदरम्यान ठिणगी पडून स्फोट झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. परंतु यांचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

### ब्लॅक डॉग स्कॉच व्हिस्कीकडून नवीन आकर्षक पॅकेजिंग केले सादर




पुणे (आरंभ पर्व) : ब्लॅक डॉग व्हिस्की या भारतातील अत्यंत प्रतिष्ठित ब्लेंडेड स्कॉच व्हिस्की ब्रँडने आपले नवीन आणि प्रगत पॅकेजिंग सादर केले आहे. हे नवीन डिझाइन गेल्या १४० वर्षांहून अधिक काळ चालत आलेल्या समृद्ध वारशाचा आत्मविश्वासपूर्ण टप्पा आहे. यामध्ये बाह्य रूपामध्ये बदल करण्यात आला असून त्यामधून ब्रँडचे मूळ वैशिष्ट्य दिसून येते, जे ग्राहकांना क्षणभर थांबून प्रत्येक सिपचा मनसोक्त आस्वाद घेण्याचे आवाहन करते. हे नवीन डिझाइन अतिशय सूक्ष्म आणि प्रगत अशा 'सेव्हर कोड्स'सह सादर करण्यात आले आहे. यामध्ये अत्यंत बारकाईने केलेले काम, प्रीमियम दर्जाचे संकेत आणि सुस्पष्ट मांडणी यांचा समावेश आहे. हे डिझाइन आजच्या तरुण आणि बदलत्या पिढीच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन तयार केले आहे, तरीही यात ब्लॅक डॉगची मूळ ओळख कायम राखण्यात आली आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी ब्रँडची 'सेव्हर द सिप'संकल्पना आहे - स्कॉच पिणे ही एक घाईघाईची कृती नसून सजग आणि तल्लीन करणारा अनुभव असावा, असे हे आमंत्रण आहे. स्कॉटलंडमधील निवडक डिस्टिलरीजमधून, विशेषतः प्रसिद्ध लिंकवूड डिस्टिलरीमधून, जिथे निष्णात कारागीर प्रत्येक थेंबाला परिपूर्ण बनवतात, हा ब्लेंड तयार केला जातो. ही व्हिस्की थ्री-कास्क मॅच्युरेशन प्रक्रियेतून जाते, ज्यामधून कारागिरी आणि फ्लेवरमधील सूक्ष्म बारकावे दिसून येतात. अधिक सुस्पष्ट आणि प्रीमियम संरचना दृढ करत ब्लॅक डॉग व्हिस्कीच्या नूतनीकरण केलेल्या पोर्टफोलिओमध्ये दोन वैशिष्ट्यपूर्ण प्रकारांचा समावेश आहे, जे प्रत्येक ग्राहकाला अनोखा चवीचा अनुभव देतात:

## ४ वर्षांच्या मुलीवर द्विपक्षीय कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी

### पुण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलची उल्लेखनीय कामगिरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

Jupiter Hospital Pune येथे ४ वर्षांच्या मुलीवर अत्याधुनिक द्विपक्षीय (बायलेट्रल) कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली असून, श्रवणशक्ती पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. रुग्णकेंद्रित आणि प्रगत आरोग्यसेवेच्या दिशेने उचललेले हे मोठे पाऊल आहे.

ही शस्त्रक्रिया प्रख्यात ईएनटी तज्ञ Dr. Colonel Inderdeep Singh आणि Dr. Sumitpal Bhatti यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. तीव्र श्रवणदोष असलेल्या या बालरुग्णामध्ये उपचारानंतर लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. डॉ. कर्नल इंदरदीप सिंग म्हणाले, "नेक्सा इम्प्लांट भविष्यात नवीन बाह्य प्रोसेसरसोबत सहज अपग्रेड करता येते, ज्यामुळे अधिक समृद्ध श्रवण अनुभव मिळू शकतो. यामध्ये समाविष्ट असलेली इंटिग्रेटेड चिप क्लिनिकल डेटा साठवते आणि सतत निरीक्षण सुलभ करते. स्मार्ट नेव्हिगेशन सिस्टिमच्या सहाय्याने शस्त्रक्रिया केल्यामुळे इलेक्ट्रोडची अचूक बसवणी सुनिश्चित करण्यात आली." कॉक्लिअर इम्प्लांट प्रक्रियेद्वारे आतील कानातील निकामी झालेल्या भागांना वगळून श्रवण नसांना थेट उत्तेजित केले जाते, ज्यामुळे रुग्णाला आवाज



ऐकण्याची क्षमता प्राप्त होते. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे ही प्रक्रिया अधिक सुरक्षित, अचूक आणि परिणामकारक ठरत आहे.

डॉ. सिंग पुढे म्हणाले, "द्विपक्षीय कॉक्लिअर इम्प्लांटमुळे रुग्णांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडतो. विशेषतः लहान वयात उपचार झाल्यास मुलांच्या बोलण्याची व संवाद कौशल्यांची झपाट्याने प्रगती होते." डॉ. सुमितपाल भट्टी म्हणाले, "कॉक्लिअर इम्प्लांट तंत्रज्ञानात सातत्याने प्रगती होत असून आता अधिक स्मार्ट आणि भविष्यात अपग्रेड करता येणारी उपकरणे उपलब्ध आहेत. अचूक शस्त्रक्रिया आणि वेळेवर निदान हे यशाचे प्रमुख घटक आहेत."जन्मतः श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी कॉक्लिअर इम्प्लांट उपचार क्रांतिकारक ठरत असून, लवकर निदान व हस्तक्षेप त्यांच्या भाषिक आणि बौद्धिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सेवानिवृत्तांचे धरणे आंदोलन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (म.जी.प्रा.) मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मागील दोन महिन्यांपासून निवृत्ती वेतन मिळाले नसल्यामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून आज पुण्यात धरणे आंदोलन करण्यात आले. भीषण उन्हाळ्यात वयोवृद्ध कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येत असल्याने तात्काळ पेन्शन तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. म.जी.प्रा. कर्मचारी संघर्ष कृती समितीच्या वतीने राज्यातील सर्व कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात आले. या वेळी शासनाकडे निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली. हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे. तसेच म.जी. प्रा. च्या मुकह्या अभियंता वैशाली आवटे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात



### दोन महिन्यांपासून पेन्शन बंद

आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष एस. डी. देशपांडे, उपाध्यक्ष स. सी. आलेकर, कार्याध्यक्ष ए. जी. देशमुख, अरुण निर्भवणे, गजानन गटलेवार, ए. जी. देशमुख, सरचिटणीस संजय केळकर, डी . के. इनामदार, प्रिया माळी, श्रीकांत राऊत यांच्यासह शेकडो निवृत्त कर्मचारी , अभियंते उपस्थित होते. संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महालेखाकार कार्यालयाने लेखाशीर्ष गोठविल्यामुळे मार्च २०२६ पासून सेवानिवृत्ती वेतन देणे थांबवले आहे. तसेच वेतनासाठी वापरण्यात येणाऱ्या तात्पुरत्या कोडची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपल्याने पुढील वेतन वितरण अशक्य झाल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक आर्थिक संकटात सापडले असून त्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. औषधोपचारांसाठीही पैसे उपलब्ध नसल्याने अनेकांची प्रकृती खालावत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेने नमूद केले की, २३ मार्च २०१७ रोजी शासनाने म.जी.प्रा. कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा देऊन त्यांच्या वेतन व निवृत्ती वेतनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप पूर्णपणे झालेली नाही.

या पार्श्वभूमीवर, शासनाने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित बाबी मार्गी लावाव्यात आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्वरित पेन्शन अदा करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. म.जी.प्रा. कर्मचारी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष अरुण निर्भवणे व सरचिटणीस गजानन गटलेवार यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

## महालक्ष्मी सरस मध्ये चंद्रपूरच्या चित्रा बोरुडे यांची कमाल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला उद्योजकांनी आपल्या भागातील पारंपरिक चवी मुंबईकरांसमोर मांडल्या आहेत. हस्तकला, ग्रामीण उत्पादने आणि खाद्यसंस्कृती यांचा सुंदर संगम या मेळ्यात पाहायला मिळत आहे. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील मेंडकी



गावच्या चित्रा विशाल बोरुडे यांनी सादर केलेल्या तब्बल ३५ प्रकारच्या लोणच्यांनी ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. लॉकडाऊनच्या काळात चित्रा बोरुडे यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले. त्यांचे पती कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करत होते; मात्र लॉकडाऊनमध्ये त्याचं काम पूर्णपणे बंद पडलं. घरात दोन मुलांचे शिक्षण, दैनंदिन खर्च आणि इतर जबाबदाऱ्या वाढू लागल्या. घर चालवण्यासाठी चित्रा आणि त्यांचे कुटुंब शेतात मजुरी करू लागले. मात्र दिवसभर काम करूनही केवळ १५० ते २०० रुपये मिळत असल्याने त्यातून घरखर्च भागवणे कठीण होत होते. या काळात चित्रा बोरुडे यांनी घरच्या घरी काहीतरी नवीन करण्याचा विचार केला. त्यांच्या घराच्या आजूबाजूला आंब्याची झाडं होती. त्यावेळी त्यांच्या मनात विचार आला की, आपल्याकडे चांगल्या दर्जाचे आंबे आहेत, तर एकदा लोणचं करून पाहूया.

## प्रवासी महिलेच्या बॅगेतील साडेचार लाखांचे दागिने चोरट्यांनी लांबविले

### राजगुरूनगर एसटी बसस्थानकावरील घटना

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील एसटी बसबसस्थानकावरील एसटी बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या बॅगेतील सुमारे साडेचार लाखांचे सोन्याचे दागिने लांबविल्याची घटना रविवारी (दि.३) घडली. शारदा विष्णू निघोट (सध्या रा. भटवाडी, घाटकोपर, मुंबई, मुळ रा. निघोटवाडी ता आंबेगाव, जि. पुणे) यांनी खेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.

याबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सायंकाळच्या सुमारास चोरीची घटना घडली. राजगुरुनगर एसटी बसबसस्थानकावरून राजगुरूनगर ते वाडा या एसटी बसमध्ये शारदा निघोट चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बॅगेची चैन उघडून त्यातील पर्स काढून घेतली. या पर्समधील साडेचार लाखांचे साडेचार तोळ्याचे मणीमंगळसुत्र, पंधराशे रुपये रोख, आधारकार्ड, पॅनकार्ड, एटीएम कार्ड आदी चोरुन नेले.

दरम्यान, याबाबत सीसीटीव्ही फुटेज तपासत असताना संशयीत चोरटे दिसत आहेत. परंतु सीसीटीव्ही कॅमेऱ्यात अगदी जवळच्या अंतरावरील चित्रणही अस्पष्ट दिसते. त्यामुळे याठीकाणी दर्जेदार कॅमेऱ्यांची आवश्यकता असल्याचे पोलीसांनी सांगितले. याप्रकरणी पुढील तपास खेड पोलिस स्टेशनचे पोलीस नाईक जिजाबापू बिडकर करत आहेत. पोलीस फिर्यादीमध्ये या दागिन्यांची जुनी खरेदी किंमत नमूद असली तरी, सध्या सोन्याच्या दराने उच्चांक गाठला आहे. सध्या बाजारात २२ कॅरेट सोन्याचा प्रति तोळा (१० ग्रॅम) दर अंदाजे दिड लाख रुपयांच्या घरात पोहोचला आहे. त्यानुसार,



चोरीला गेलेल्या या एकूण साडेचार तोळे सोन्याच्या दागिन्यांची आजच्या बाजारभावाप्रमाणे एकूण किंमत तब्बल ७ लाख रुपयांच्या आसपास होत आहे. नागरीकांनी सतर्क राहुन प्रवासात आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी केले आहे.

## श्रीकृष्ण मंदिरात बालसंस्कार शिबीर उत्साहात संपन्न

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महानुभाव पंथ हा १२ व्या शतकात श्रीचक्रधर स्वामींनी स्थापन केलेला, सामाजिक समता, भक्ती आणि ज्ञानमार्गावर भर देणारा महाराष्ट्रातील एक प्रमुख संप्रदाय आहे. हा पंथ निर्गुण-सगुण परमेश्वर, पंचकृष्ण उपासना, द्वैतवाद आणि स्त्री-शूद्रांसह सर्वांना मोक्षाचा अधिकार मानतो. परमेश्वराचे पाच अवतार मानले जातात, ज्यांना 'पंचकृष्ण' म्हणतात, श्रीकृष्ण, श्री दत्तात्रेय प्रभु, श्रीचक्रपाणी, श्री गोविंदप्रभू, सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी. उरुळी कांचन येथील श्रीकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण सेवा मंडळ आयोजित बालसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले. परम पूज्य सुबोधमुनी धाराशिवकर यांनी मुलांना देवपूजा कशी करावी, दंडवत प्रणाम कसा घालवायचा आदी विधी आचरण याबद्दल मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत माहिती दिली. बालसंस्कार शिबीरास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी बालसंस्कार शिबीर अत्यंत महत्त्वाचे आहे. बालकांमध्ये चांगले विचार, नैतिकता आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवणे हि काळाची गरज असल्याचे मत माजी उपसरपंच पै दत्तात्रय कांचन यांनी सांगितले.

## एमएसडी इंडियाने माधुरी दीक्षितसोबत देशभरात सर्वाइकल कॅन्सर जागरूकता उपक्रम केला सुरू

- **दर सात मिनिटांनी भारतात जवळपास एका महिलेचा सर्वाइकल कॅन्सरमुळे मृत्यू होतो, जरी हा आजार मोठ्या प्रमाणात टाळता येण्यासारखा आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमएसडी (ज्याला युनायटेड स्टेट्स आणि कॅनडामध्ये मर्क एंड कंपनी, इंक., रहवे, एन.जे., यूएसए म्हणून ओळखले जाते) यांनी आज भारतात आपल्या सर्वाइकल कॅन्सर जागरूकता मोहिमेची सुरुवात जाहीर केली. हा उपक्रम प्रसिद्ध अभिनेत्री, सार्वजनिक व्यक्तिमत्त्व आणि आई माधुरी दीक्षित नेने यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश महिलांच्या प्रतिबंधात्मक आरोग्याविषयीच्या



चर्चांना पुढे आणणे आणि देशभरातील महिला व पालकांना सर्वाइकल कॅन्सर आणि त्याच्या प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेल्या योग्य आरोग्य पर्यायांविषयी डॉक्टरांशी चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. सर्वाइकल कॅन्सर हा भारतातील महिलांना प्रभावित करणाऱ्या सर्वात सामान्य कॅन्सरपैकी एक आहे. वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेऊन आणि योग्य प्रतिबंधात्मक उपाय केल्यास हा आजार मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो, तरीही भारतात दर सात मिनिटांनी जवळपास एका महिलेचा मृत्यू होतो, म्हणजेच दररोज सुमारे 200 मृत्यू होतात (ग्लोबोकॅन एचपीव्ही इंडिया रिपोर्ट 2023 नुसार डेटा). ही मोहीम विशेषतः महिलांमध्ये जागरूकतेची कमतरता आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा घेण्यास होणारा विलंब या महत्त्वाच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करते. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, माधुरी दीक्षित यांच्यासोबत लघु डिजिटल चित्रफितींची मालिका विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्यात आली. सोप्या, तथ्याधारित आणि माहितीपूर्ण संदेशांद्वारे या चित्रफितींमध्ये सर्वाइकल कॅन्सरविषयी महत्त्वाची माहिती, त्याचा मानव पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) याच्याशी असलेला संबंध, तसेच आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची गरज यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. या चित्रफिती महिलांना आणि पालकांना सर्वाइकल कॅन्सरच्या प्रतिबंधाबाबत स्त्रीरोग तज्ज्ञ आणि बालरोग तज्ज्ञांसोबत संवाद साधण्याला प्राधान्य देण्याचे आवाहन करतात आणि आरोग्य तज्ज्ञांशी जागरूकतेने व योग्य माहितीच्या आधारे चर्चा करण्याचे महत्त्व अधोरेखित करतात.

ही मोहीम व्यक्ती आणि कुटुंबांना यावर विचार करण्यास प्रवृत्त करते की, प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय उपलब्ध असतानाही आरोग्याशी संबंधित निर्णय अनेकदा लक्षणे दिसेपर्यंत पुढे ढकलले जातात. ही मोहीम यावर भर देते की सर्वाइकल कॅन्सर हा उशिरा ओळखला जाणारा आणखी एक आजार बनू नये.

## बँकिंगसाठी व्यवसाय अनुभव ही पुढील सीमा का आहे?

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतीय बँकिंग क्षेत्रात शांत क्रांती होत आहे. गेल्या दशकात, आम्ही "फ्रंट-एंड" मध्ये गुंतलो होतो, ज्यात आकर्षक ॲप्स, 10-सेकंदांचे कर्ज मंजूर करणे आणि घर्षणरहित UPI पेमेंट्स यांचा समावेश होता. आम्ही स्क्रीनवर सोयीस्करता निर्माण केली. परंतु 2030 कडे पाहताना, स्पर्धात्मक युद्धभूमी बदलत आहे. जिथे प्रत्येक निओ-बँक आणि फिनटेक सुंदर इंटरफेस देतात, तिथे "ग्राहक अनुभव" (CX) सामान्य झाला आहे. आता खरा फरक म्हणजे मी ज्याला व्यवसाय अनुभव (BX) म्हणतो: अदृश्य, लवचिक यंत्रणा जी आम्ही आमच्या ग्राहकांना दिलेल्या वचनाला शक्ती देते - श्री. लक्ष्मण वेलायुथम, प्रमुख – मुख्य विपणन अधिकारी, उज्जीवन



स्मॉल फायनान्स बँक फ्रंट-एंडचा भ्रम- बँकिंग ॲपला लक्झरी कारच्या डॅशबोर्डसारखे समजा. ते भव्य दिसते, परंतु जर इंजिन (आमची मुख्य बँकिंग प्रणाली) बिघडले किंवा सुरक्षा प्रणाली (अनुपालन आणि सायबरसुरक्षा) अयशस्वी झाली, तर ड्रायव्हिंगचा अनुभव कोसळतो. ग्राहक-केंद्रित चॅनेल मुख्य बँकिंग प्रणाली, अनुपालन फ्रेमवर्क, सायबरसुरक्षा नियंत्रणे आणि सेवा वर्कफ्लो यांच्या समन्वयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. अनेक बँकांसाठी, हा फरक अस्तित्वाचा आहे. आम्ही वाढत्या भारताच्या आकांक्षा पूर्ण करतो, ज्यात बंगळूरमधील गिग वर्करपासून ते कोईम्बतूरमधील MSME मालकापर्यंत आणि बंगळूरमधील फॅमिली ऑफिसपर्यंत यांचा समावेश आहे. त्यांना फक्त ॲपची गरज नाही; त्यांना अशा संस्थेची गरज आहे जी महत्त्वाच्या वेळी काम करते. बँकिंग वाढीचा पुढील टप्पा केवळ प्रमाणाने नव्हे, तर सातत्याने सखोल वैयक्तिकृत आणि विश्वासार्ह सेवा प्रदान करण्याच्या क्षमतेने चालविला जाईल, हा फायदा पृष्ठभागावरील इंटरफेसऐवजी कार्यात्मक सामर्थ्यामध्ये रुजलेला आहे.

### बँकिंगमध्ये "बोरिंग" का जिंकते

बँकांना इतर व्यवसायांपासून वेगळे काय करते ते येथे आहे: आम्ही पैशांचे व्यवहार करतो. आम्ही विश्वासाचे व्यवहार करतो. आम्ही भविष्याचे व्यवहार करतो. ही चमकधमक असलेल्या नवोपक्रम प्रदर्शनाची जागा नाही. ही कंटाळवाणी विश्वासार्हतेची जागा आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे

### १६,२२३ ट्रॅक्टर विक्रीसह ३५.६% वाढ; सोनालिकाची दमदार सुरुवात



पुणे (आरंभ पर्व) : भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने एप्रिल महिन्यात आजपर्यंतची सर्वाधिक एकूण १६,२२३ ट्रॅक्टरची विक्री करून आर्थिक वर्ष २०२७ च्या प्रवासाची जोरदार आणि धोरणात्मक सुरुवात केली आहे. या उद्योगातील बाजारपेठेचा सर्वाधिक वाटा मिळविणाऱ्यांमध्ये तिने प्रमुख स्थान मिळवले आहे. यासाठी तिच्या स्तंभित करेल अशा ३५.६ % एकंदर वाढीची चालना मिळाली असून तिने उद्योगाच्या २७% (अंदाजे) वाढीच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे. कंपनीची आपल्या ३० व्या वर्षात 'जीतने का दम' मिळवून देण्याच्या शेतकरी-प्रथम तत्त्वज्ञानावर निर्भरता कायम असून अधिक शेतकरी कार्यक्षमता आणि उत्पन्न क्षमतेसाठी प्रगत कृषी-नवकल्पनांचा तिला आधार मिळाला आहे. अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन आणि जीएसटीच्या दरात कपात झाल्यानंतर वाढत्या यांत्रिकीकरणामुळे, भारताच्या शेती क्षेत्राच्या वाढीच्या गाथेचा पुढील टप्पा तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन पोर्टफोलिओ आणि अंमलबजावणीचा अथक वेग यांवर अवलंबून असेल. हवामानातील अस्थिरता आणि वाढत्या कामगिरीच्या अपेक्षांमुळे ग्रामीण भागातील आकांक्षा आकाराला येत आहेत. अशा वेळेस सोनालिका १९ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उभी आहे. आपले उच्च गुणवत्तेचे ट्रॅक्टर सर्व प्रकारच्या वापरांमध्ये अखंडपणे कामगिरी करतील याची हमी ती देते. जगातील सर्वात मोठा इंटिग्रेटेड ट्रॅक्टर उत्पादक कारखाना आणि प्रगत संशोधन आणि विकास क्षमतांचे पाठबळ लाभलेला हा ब्रँड शक्तिशाली आणि भविष्यवेधी उत्पादनांसह भारतीय शेतीच्या परिवर्तनाचे नेतृत्व करत आहे.

### ठार मारण्याची धमकी; तलवार जप्त

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पत्नीला जीवे ठार मारण्याची धमकी देत घरात धारदार तलवार लपवून ठेवल्याच्या गंभीर प्रकरणात लोणी काळभोर (ता. हवेली) पोलिसांनी मध्यरात्री कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी प्राजक्ता मनीष पाबळे यांना त्यांचे पती मनीष बाबुराव पाबळे (वय ४१, रा. पाषाणकर बाग, लोणी काळभोर) यांनी बंदुकीने ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार केली होती. यासंदर्भातील व्हॉईस रेकॉर्डिंगही पोलिसांकडे दिले होते. या तक्रारीची दखल घेत पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने मंगळवार (५ मे) रोजी पहाटे पावणे दोन वाजण्याच्या सुमारास घरावर छापा टाकला. सुरुवातीला पापंबळे याने झडतीस विरोध व टाळाटाळ केली, परंतु पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर घराची सखोल तपासणी करण्यात आली. झडतीदरम्यान घरातील लोखंडी कपाटात लपवून ठेवलेली एक धारदार लोखंडी तलवार पोलिसांच्या हाती लागली. ही तलवार सुमारे ७१ सेंटीमीटर लांबीची असून तिच्या पात्याला धार असल्याचे आढळले. पोलिसांनी ती जप्त केली आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार निखील श्रीरंग मेमाणे यांनी सरकारच्यावतीने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मनीष पाबळे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय पुणे शहर पोलीस प्रशासनाने जारी केलेल्या प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन केल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे.

### महेश्वरीला मिळाली FRNDची साथ

पुणे (आरंभ पर्व) : सध्याच्या वाढत्या वेगवान आणि डिजिटल जगात अर्थपूर्ण मानवी नातेसंबंध बहुतांश वेळेस दुर्मिळ होऊन बसतात. अशाच परिस्थितीतून गेलेल्या चेन्नईच्या एका तरुणीला एफआरएनडी या ॲपच्या साहाय्याने केवळ साथ मिळाली नाही तर स्वतःचा सूरही गवसला. तेव्हा भावनिक स्वास्थ्य आणि आत्म-अभिव्यक्तीच्या दिशेने तिच्या प्रवासात या ॲपचा शोध हे एक परिवर्तनकारी वळण ठरले आहे. महेश्वरी ही चेन्नईत राहणारी ३५ वर्षीय टेलर. सोशल मीडियातील इन्फ्लुएन्सर, परंतु घटस्फोटाच्या त्रासदायक प्रक्रियेतून गेल्यानंतर माहेश्वरी प्रचंड, एकटेपणा, ताण आणि जागरणाचा सामना करत होती. सोशल मीडियातील इन्फ्लुएन्सर म्हणून समाजात सक्रिय असूनही डिजिटल प्रसिद्धीमुळे प्रत्यक्षात संबंध निर्माण होत नाही, याची जाणीव तिला झाली. "तुमची सामग्री नेमक्या कोणापर्यंत पोहोचते हे तुम्हाला कधीच कळत नाही," असे सांगून प्रेक्षकांचा सहभाग आणि खरा मानवी संवाद यांमधील दरी तिने अधोरेखित केली.

### सभासद हा केंद्रबिंदू मानून कामकाज करणार - उमाकांत सूर्यवंशी




दौंड (दै. आरंभ पर्व)

पुणे जिल्हा परिषद सेवक सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत दीड दशकानंतर 'सत्तांतर' झाले आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य लिपिक संघटनेचे कोशाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी हे संचालक पदी निवडून आल्यानंतर सत्कार समारंभात ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या सर्व विभागातून अभिनंदन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने विभागीय अध्यक्ष जगदीश महामुनी,पुणे जिल्हा लिपिक संघटनेचे मार्गदर्शक शेखर गायकवाड आरोग्यसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप जगताप आणि परिचारिका संघटनेच्या राज्य अध्यक्षा मिनाक्षी मुदगल-शिंदे इंद्रजित जाधव नानासाहेब मारकड संजना शिंदे मीरा टेकवडे यांनी मिळून स्थापन केलेल्या परिवर्तन पॅनेलचा समावेश होता. झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत २१ पैकी २० जागांवर विजय मिळवत,परिवर्तन पॅनेलने सत्ता 'परिवर्तन' केले आहे. यावेळी उमाकांत सूर्यवंशी यांनी सांगितले कि पतसंस्थेचे नव्याने सभासद नोंदणी आणि राजीनामा दिलेल्या सभासदांना पहिल्या महिन्यात सभासद करून घेणार आहोत. सभासद हा खरा मालक असून पतसंस्थेचा कारभार हा सभासद केंद्रबिंदू मानून काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. राज्यस्तरावर लिपिक संघटनेच्या माध्यमातून आजपर्यंत लिपिकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम प्रयत्नशील असलेलं नेतृत्व म्हणजे उमाकांत. सर्व संचालक यांना बरोबर घेऊन पतसंस्थेच्या निवडणुकीच्या काळात जाहिरामध्यात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करणे हेच आमचं ध्येय आहे. सभासदांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि आर्थिक शिस्त मजबूत करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धारही यावेळी सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.

# १६ वर्षांनंतरचा गेट टुगेदर

## आठवणींचा ओलावा आणि मैत्रीचा नव्याने उलगडलेला धागा!







• शब्दांकन •

मा. श्री. लक्ष्मण साबळे

पुणे (दै. आरंभ पर्व)

शरदचंद्रजी पवार प्रशाला सारोळे म्हणजे आपली शाळा.. आज खूप आनंदी वाटली. कारण १६ वर्षांचा काळ जणू शांतपणे सरून गेला.प्रत्येक जण आपल्या आयुष्याच्या वाटेवर पुढे निघून गेला, जबाबदाऱ्यांच्या ओझ्यात गुंतला; पण मनाच्या कोपऱ्यात मात्र शाळेच्या त्या निरागस आठवणी कायम जिवंत राहिल्या. आणि अखेर तो दिवस उजाडला,पुन्हा एकदा सगळे एकत्र येण्याचा!

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली आणि वातावरणात एक वेगळीच पवित्रता निर्माण झाली. त्यानंतर सुरू झालेल्या मनोगतांच्या सत्रात प्रत्येक जण जणू भूतकाळात रमला. जुन्या आठवणी, खोडकर किस्से, शिक्षकांचे संस्कार सगळं काही पुन्हा जिवंत झालं. बोलता बोलता तीन तास कधी संपले, हे कुणालाच कळलं नाही. शिंदे सर, गायकवाड सर,गाढवे सर ,खटाळ सर यांनी त्यांच्या अनुभवातून दिलेलं मार्गदर्शन मनाला भिडणारं होतं. मुळे सरांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि अनेकांच्या डोळ्यांत नकळत पाणीही आलं. कार्यक्रमाचे अध्यक्ष विलासदादा गाटे यांनी आपल्या जीवनप्रवासाची कहाणी सांगत प्रेरणा दिली. खोत सरांनी शांतपणे शंभर टक्के निकाल मिळवण्यामागचं गुपित उलगडत शिक्षणातील सातत्य आणि शिस्त यांचं महत्त्व अधोरेखित केलं.

नेतृत्वासाठी ओळख असलेले साबळे सर यांनी विद्यार्थ्यांसाठी सहकार्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी सर्वांना अतुल पाटील सर यांची उणीव भासली.. सरांनी संदेश द्वारे आपले विचार व्यक्त केले. पुढील वर्षी सर्वजण एकत्र भेटण्याचा निर्धार पाटील सरांनी व्यक्त केला आहे.

"विचार निर्मळ असतील तर मोठी गोष्ट साध्य होते," हा विचार मी मांडला. प्रत्येकाच्या मनात खोलवर रुजला. त्या क्षणी अनेकांच्या मनात दडलेल्या भावना जाग्या झाल्या. खूप काही बोलायचं होतं, व्यक्त व्हायचं होतं; पण वेळेच्या मर्यादेमुळे काही गोष्टी मनातच राहून गेल्या. आणि हीच एक हळवी खंत सर्वांच्या चेहऱ्यावर उमटली. यानंतर स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घेत, थंडगार आईस्क्रीमची गोडी अनुभवत दुसऱ्या सत्राला सुरुवात झाली. कदम सरांनी हजेरी घेत कार्यक्रमाला शिस्तबद्ध रूप दिलं, खंदारे सर ,भड सरांनी दिलेला कानमंत्र सर्वांच्या मनात घर करून गेला. विरंगुळ्याच्या सत्रात गाण्यांच्या भेंड्या आणि उखाण्यांनी वातावरण पुन्हा एकदा रंगतदार झालं. हशा, टाळ्या आणि आनंदाचा ओघ थांबत नव्हता.

कधी एकमेकांना न बोललेलो आज मात्र सर्वांना दिलंखुलास बोलत होते.. हे एक सुंदर चित्र होते. सोळा वर्षाचा हा अबोला एका दिवसाने मिटवून टाकला होता. तिसऱ्या सत्रात खेळांचा जल्लोष रंगला. खो-खो आणि लगोरी खेळताना १६ वर्षांचा काळ जणू क्षणात नाहीसा झाला. पुन्हा एकदा बालपण जगण्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. त्या मैदानावर फक्त खेळ नव्हते, तर जपलेल्या आठवणींचा उत्सव साजरा होत होता.

कार्यक्रमात सर्वांनी थंडगार ज्यूस, मठ्ठा आणि पाण्याचा आस्वाद घेतला. या संस्मरणीय गेट-टुगेदरचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सोमनाथ पाटील आणि विपिन पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. "फिर मिलेंगे..." या एका वाक्यातच सगळ्यांच्या भावना सामावल्या होत्या. हा केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर पुन्हा एकदा जुळलेल्या नात्यांचा, नव्याने फुललेल्या मैत्रीचा आणि आठवणींच्या ओलाव्याचा अविस्मरणीय सोहळा होता.

शाळा सोडताना मन भाऊक झाले होते. सोळा वर्षानंतर शाळेत आलो मात्र आता पुन्हा कधी तरी भेटूया अशी साद घालत घराच्या दिशेने निघालो.. हे सर्व सवंगडी, मित्र , मैत्रिणी पुन्हा एकत्र येतील ही आशा बाळगून निरोप घेतला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या इमारत दुरुस्तीसाठी सहकार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

जीवनाच्या व्यस्ततून जबाबदारीतून मुक्त होत शाळेतल्या बालपण पुन्हा जगलो याचा आनंद खूप वाटला. पुन्हा एकदा सर्वांना नक्की भेटायला आवडेल तूर्तास ह्या सुंदर आठवणी कायमस्वरूपी जतन करू धन्यवाद...!

## स्टेनली जॉर्डन आणि केनवुड डेनार्ड यांचे लाईव्ह परफॉर्मन्स



नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

विंडमिल्स क्राफ्टवर्क्सतर्फे बेंगळुरू आणि हैदराबादमध्ये प्रसिद्ध गिटारवादक स्टेनली जॉर्डन यांचे स्वागत; त्यांच्या अनोख्या गिटार वाजवण्याच्या शैलीने संगीताला नवा आयाम दिला आहे. त्यांच्यासोबत प्रसिद्ध ड्रमर केनवुड डेनार्ड देखील लाईव्ह परफॉर्मन्स सादर करणार आहेत.

भारतामधील खास अनुभव देणाऱ्या ठिकाणांपैकी एक असलेले विंडमिल्स क्राफ्टवर्क्स हे संगीत, आंतरराष्ट्रीय खाद्यसंस्कृती, क्राफ्ट बिअर आणि सुंदर आर्किटेक्चर यांचा संगम घडवून अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी ओळखले जाते. या मे महिन्यात, टोटल एन्व्हायर्नमेंट म्युझिक फाउंडेशनतर्फे चार वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवलेले जॅझ गिटार वादक स्टेनली जॉर्डन यांचा खास लाइव्ह परफॉर्मन्स आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्यासोबत प्रसिद्ध दमदार ड्रमर केनवुड डेनार्ड देखील असतील. हा कार्यक्रम 15 मे 2026 रोजी विंडमिल्स क्राफ्टवर्क्स, हैदराबाद येथे होईल. त्यानंतर 16 आणि 17 मे 2026 रोजी बेंगळुरूमध्येही हा कार्यक्रम सादर केला जाईल.

संगीतप्रेमींना या कार्यक्रमात सुंदर ताल, सहज सादरीकरण (इम्प्रोव्हायझेशन), जॅझ संगीताचा आनंद घेता येईल.

## ग्रामविकास अधिकारी रवींद्र जाधव यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न




जुन्नर (दै. आरंभ पर्व)

जुन्नर तालुक्यातील आदर्श ग्राम काळवाडीचे आदर्श ग्रामविकास अधिकारी रवींद्र कान्हू जाधव यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ शनिवारी दि.२ मे रोजी काळवाडी येथे उत्साहात संपन्न झाला. ग्रामपंचायत काळवाडी व श्री कालिकामाता विकास ट्रस्ट यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामविकास अधिकारी रवींद्र जाधव व परिवार तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच तुषार वामन, माजी सरपंच अंजलीताई वामन, माजी उपसरपंच मनोरंजन वामन, शुभम सातकर, मंगेश दुराफे, सीताराम कुटे, एकनाथ बेल्हेकर, शुभंगीताई काकडे, अलका वामन, अशोक भोर, रघुनाथ बेल्हेकर, रणधीर काकडे, दिपक काकडे, महेंद्र वामन, चंद्रकांत काकडे, निवृत्ती काकडे व काळवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत काळवाडी, श्रीकालिकामाता विकास ट्रस्ट व गावातील अनेक संस्थांच्या वतीने तसेच ग्रामस्थांच्या वतीने जाधव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच अंजलीताई वामन यांनी रवींद्र जाधव यांनी उत्कृष्ठ काम केले व गावाला अनेक पुरस्कार मिळवून दिले तसेच जाधव यांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांस खूप सहकार्य केले. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी मनोरंजन वामन, सुनिल वामन, शुभम सातकर, सुजाता जाधव यांनी मनोगत व्यक्त करताना जाधव यांनी केलेल्या कामांचा गौरव केला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व गौरव समारंभबद्दल धन्यवाद दिले. उपसरपंच बाबासाहेब वामन यांनी प्रास्ताविक केले. ग्रामविकास अधिकारी श्री मंगेश दुराफे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

आदर्श ग्रामविस्तार अधिकारी रवींद्र जाधव यांचे कार्य : आपल्या ३० वर्षाच्या सेवेत त्यांनी सातारा व पुणे जिल्ह्यांत काम केले. आपला प्रामाणिकपणा, जिद्द, सचोटी, कष्ट व सेवाभाव तसेच आपल्या बहुमूल्य कामांच्या माध्यमातून आरके पॅटर्न म्हणून ओळख निर्माण केली. नाविन्यपूर्ण विकास कामांसाठी प्रोत्साहन अपारंपरिक ऊर्जा वापर, सोलर स्ट्रीट लाइट, गोबर गॅस, बचत गटांना प्रोत्साहन, गरजू लोकांना घरकुल मिळवून देणे, परसबागेचे गाव करण्यास पुढाकार, सेंद्रिय शेतीतून शाश्वत विकास करणेसाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमांतून मार्गदर्शन व सहकार्य, पायाभूत सुविधा विकास अंतर्गत रस्ते, पाणी, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, सुशोभिकारण, कृषि पर्यटन व सहलींचे आयोजन असे उल्लेखनीय कार्य केले. तसेच दरवर्षी वृक्षारोपण साठी विशेष प्रयत्न करून प्रती व्यक्ति एक झाड लावले. विविध सरकारी अभियानामध्ये उल्लेखनीय कार्य केले व अनेक पुरस्कार काळवाडी गावास मिळवून दिले.

## या उन्हाळ्यात प्रोटीनयुक्त आहार खा



नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

उन्हाळा लवकरच आला आहे, आणि किनाऱ्यावर जाण्याचे ट्रिप्स डोळ्यासमोर आहेत, आता तुमच्या फिटनेस रूटीनला सुरू करण्यासाठी योग्य वेळ आहे. जिम सेशन्स महत्त्वाचे असले तरी, आहार निरोगी शरीराचे वजन स्कल्प्ट आणि मेंटेन करण्यात तितकाच महत्त्वाचा भूमिका बजावतो. रितिका समद्दार, येथील प्रादेशिक प्रमुख डायटेटिक्स मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्ली यांचा सल्ला असा आहे की कॅलिफोर्निया ॲल्मंड्स, ग्रीक दही आणि सॅल्मन यांचा समावेश असलेली ही सोपी, प्रोटीन-युक्त योजना उपयुक्त ठरते. दिवसाची सुरुवात करा काही कॅलिफोर्निया ॲल्मंड्स घेऊन. प्रोटीन, आरोग्यदायी फॅट्स, व्हिटॅमिन ई आणि मॅग्नेशियमने भरलेले हे ॲल्मंड्स तुम्हाला ऊर्जेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात, अचानक उर्जा वाढीशिवाय. कोणत्याही फिटनेस-केंद्रित आहारासाठी हे उत्कृष्ट आहेत.

त्यांना दोन उकडलेली अंडी जोडा, जेणेकरून तुम्हाला संपूर्ण प्रोटीन मिळेल. ही कॉम्बिनेशन हलकी, पोर्टेबल आणि व्यस्त सकाळीसाठी परिपूर्ण आहे.

मिक्स्ड ग्रीन्स, चेरी टोमॅटो आणि काकडीसह ग्रिल्ड चिकन ब्रेस्ट निवडा. हे जेवण लीन प्रोटीन, फायबर आणि भाज्यांमधून हायड्रेशन प्रदान करते, ज्यामुळे तुम्ही हलके पण दुपारी तरी संतुष्ट राहता. दुपारच्या शेवटी ऊर्जेसाठी ग्रीक दही घ्या, त्यावर एका चमच्याप्रमाणे चिया बियांचा थर लावा. हा स्नॅक पचनतंत्रासाठी प्रोबायोटिक्स, टिकाऊ ऊर्जा आणि थंड करणारा, ताजेतवाने अनुभव प्रदान करतो.

दिवसाची समाप्ती करा बेक्ड सॅल्मन फिलेट्ससह, ज्यासोबत शिजवलेली क्विनोआ आणि स्टीम केलेली ब्रॉकली सर्व्ह करा. हा पौष्टिक डिश त्वचेसाठी ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, अँटी-इंफ्लेमेटरी फायदे आणि संपूर्ण प्रोटीन प्रदान करतो, जे रात्रीच्या स्नायू दुरुस्तीसाठी उपयुक्त आहे. हा सोपा दिनचर्या स्नायू वाढीस मदत करणे, भूक नियंत्रित करणे आणि वजन व्यवस्थापनास सहाय्य करणे यावर भर देतो. दुपारी जड कार्बोहायड्रेट टाळा कारण ते पचवायला अवघड असतात. प्रमाणित आहार, चांगले हायड्रेशन आणि हलकी व्यायाम यावर लक्ष केंद्रित करा. हे सोपे, व्यावहारिक टिप्स तुम्हाला उन्हाळ्याच्या उष्णतेत तंदुरुस्त आणि ऊर्जावान राहण्यासाठी मदत करू शकतात.

## मडक्यातील लोणचं ४ दिवसांत ४० किलो विक्री, १,००० रुपये किलो दर



मुंबई (दै. आरंभ पर्व)

उमेद अभियानाच्या माध्यमातून आयोजित महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये राज्यभरातून आलेल्या महिला उद्योजकांनी आपल्या व्यवसाय, हस्तकला आणि खाद्यपदार्थांद्वारे वेगळी ओळख निर्माण केली आहे. या मेळ्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील पिंपळगाव निपाणी गावच्या मंगला संजीव वाकचौरे (वय ४० वर्षे) यांनी मडक्यातील पारंपरिक लोणच्यांमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. २ मेपासून सुरू झालेल्या या मेळ्यात अवघ्या चार दिवसांत मंगला वाकचौरे यांनी ४० किलो लोणचं प्रति किलो १,००० रुपयांच्या दराने विक्री केली आहे. साडेचारशेहून अधिक स्टॉल्समधून त्यांच्या लोणच्यांचा स्टॉल हा सर्वाधिक महागड्या आणि तितकाच लोकप्रिय स्टॉल म्हणून ओळखला जात आहे.

# व्हीएफएस ग्लोबल कन्सोर्टियमला महत्त्वाचा करार प्राप्त

पुणे (दै. आरंभ पर्व)

सरकारी सेवा सुरक्षितपणे पुरवणारी जागतिक तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी 'व्हीएफएस ग्लोबल' (VFS Global) आणि 'वी एक्सेल सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड' (WE Excel Software Pvt. Ltd.) यांच्या कन्सोर्टियमने (Consortium) महाराष्ट्र सरकारच्या नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक (IGR) विभागाकडून पाच वर्षांचे कंत्राट प्राप्त केले. याअंतर्गत राज्यातील मालमत्ता नोंदणी प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने ६० अत्याधुनिक 'मॉडेल सब-रजिस्ट्रार कार्यालये' (SROs) सुरू केली जातील. हे कन्सोर्टियम महाराष्ट्रातील या मॉडेल सब-रजिस्ट्रार कार्यालयांची संपूर्ण उभारणी करेल, ज्यात मालमत्ता नोंदणी सेवांचे आधुनिकीकरण करण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचारी रुजू केले जातील.

ही अत्याधुनिक केंद्रे जलद कार्यवाही व प्रभावी सेवा देण्यासाठी डिझाइन केली जाणार असून, प्रशस्त, आधुनिक आणि पूर्णपणे वातानुकूलित सुविधा उपलब्ध असतील. प्रत्येक केंद्रात आरामदायी प्रतीक्षालय, वाय-फाय सुविधा, अखंडित प्रक्रिया सक्षम करणारी मजबूत डिजिटल प्रणाली आणि नागरिकांना सहाय्य करणारे प्रशिक्षित कर्मचारी असतील. याशिवाय, अल्पोपहार आणि पिण्याच्या पाण्याची सोय यांसारख्या अतिरिक्त सुविधांमुळे नागरिकांचा अनुभव अधिक सुखद होईल. रविंद्र बिनवडे, नोंदणी महानिरीक्षक (IGR), महाराष्ट्र सरकार, म्हणाले की, "मॉडेल ऑफिसची संकल्पना ही सध्याच्या मालमत्ता नोंदणी प्रणालीतील अडथळे दूर करण्यासाठी आखलेला एक धोरणात्मक उपक्रम आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांना लांब रांगा, गर्दी असलेली सब-रजिस्ट्रार कार्यालये आणि योग्य वातावरणाचा अभाव या समस्यांना सामोरे जावे लागले आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी विभाग 'मॉडेल सब-रजिस्ट्रार ऑफिस' हा उपाय राबवत असून ६० समर्पित कार्यालये स्थापन केली जात आहेत. ही कार्यालये पूर्णपणे शासनाच्या नियंत्रणाखाली राहतील आणि विभागीय अधिकाऱ्यांमार्फतच कार्यरत असतील, ज्यामुळे नियामक शिस्त अबाधित राहील. या कार्यालयांचा मुख्य उद्देश पारंपरिक कार्यालयांमधील गर्दी कमी करणे हा आहे. नागरिकांचा अनुभव उंचावण्यासाठी, या मॉडेल कार्यालयांमध्ये सुधारित व अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, ज्याचे व्यवस्थापन विशेष तज्ज्ञ संस्थेच्या सहकार्याने केले जाईल. या मिश्र पद्धतीमुळे शासनाचे नियंत्रण आणि आधुनिक कार्यक्षमता यांचा समन्वय साधला जाईल, ज्यामुळे व्यवहार सुरळीत आणि उच्च दर्जाचे होतील. ही कार्यालये पूर्णपणे पर्यायी स्वरूपाची असतील; नागरिकांना मॉडेल कार्यालये किंवा नियमित SRO यापैकी कोणतीही सेवा निवडण्याचे स्वातंत्र्य असेल. या कार्यालयांचे शासन केवळ विभागाद्वारेच केले जाईल."

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.